कार्यालय, जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

दुरध्वनी क्र. ०७१५२-२४२७८३ Email-id- dwozpwardha@gmail.com

क्रमांक :सकवि/जि.प.वर्धा/२०%सेसफंड५% दिव्यांग वै.योजना/प्रेसनोट / ११६६/२५-२६ दिनांक २१/८/२०२५

प्रति,

श्री निशांत वानखडे,
प्रकल्प प्रमुख, माहिती तंत्रज्ञान विभाग
जिल्हा परिषद वर्धा

विषय :- जिल्हा परिषद ५% दिव्यांग वैयक्तीक लाभ योजनेबाबत अर्ज मागविण्या करिता विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबत.

संदर्भ :- १) समाज कल्याण समिती सभा दिनांक ०८.०८.२०२५
२) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक २१.०८.२०२५

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद वर्धा, व्दारा ५ % जिल्हा परिषद वैयक्तीक लाभ योजनेअंतर्गत अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थ्यांकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात **"अस्थीव्यंग प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थ्यांना पेट्रोल चलित स्कुटी पुरविणे "** ही योजना राबविण्यात येत आहे.

१.जिल्हा परिषद मार्फत ५%दिव्यांग निधी अंतर्गत दिव्यांगाकरीता राबविण्यात येणारी योजना :-

| अ. क्र. | मिळणारे साहित्य किंवा उपकरणे | निकष | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १. | अस्थीव्यंग प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थ्यांना पेट्रोल चलित स्कुटी योजना | १) दिव्यांग लाभार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा<br>२) लाभार्थी अस्थिव्यंग प्रवर्गातील असणे आवश्यक<br>३) अस्थीव्यंग लाभार्थ्यांचे दिव्यंगत्व ४०% किंवा त्यापेक्षा जास्त असावे<br>४) दिव्यांगाची निवड ग्रामसभे मार्फत होणे आवश्यक<br>५) दिव्यांग लाभार्थ्यांचे वय १८ वर्ष पेक्षा कमी व ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे<br>६) दिव्यांग लाभार्थ्याच्या कुटुंबाचे सर्व मार्गानि मिळुन एकुण उत्पन्न रु. १.०० लक्ष च्या वर नसावे<br>७) शासनाच्या इतर योजनेतुन सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>८) वाहन चालविण्याचा परवाना (driving licence)असणे आवश्यक. | १. दिव्यंगत्वाचे प्रमाणपत्र. ( UDID Certificate) लाभार्थ्यांचे दिव्यांगत्व ४०% किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक<br>२. दिव्यांग लाभार्थ्यांचे वय १८ वर्ष ते ५५ वर्षापर्यंतचे असल्याचा पुरावा जोडणे आवश्यक (शाळा सोडल्याचा दाखला)<br>३. सन २०२४-२५ चे उत्पन्न प्रमाणपत्र (तहसिलदार/नायब तहसिलदार)<br>४. वाहन चालविण्याचा परवाना (driving licence) जोडणे आवश्यक<br>५. दिव्यांग लाभार्थीचे नांव असलेले बँकेची पासबुकाची झेरॉक्स प्रत. ( आधार क्रमांक लिंक केलेलेच)<br>६. दिव्यांग लाभार्थीचे आधारकार्डची झेरॉक्स प्रत<br>७. राशन कार्ड झेरॉक्स प्रत |

वरीलप्रमाणे नमुद योजना ही १००% अनुदान तत्वावर राबविण्यात येणार असल्याने पात्र इच्छुक दिव्यांग लाभार्थ्यांनी संबधित पंचायत समिती स्तरावर संपर्क साधुन सदरील योजनांचे अर्ज आवश्यक कागदपत्रासहित **दिनांक ३०.०९.२०२५** पर्यंत संबधित पंचायत समिती स्तरावर सादर करण्याचे आवाहन श्री पराग सोमण, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वर्धा आणि श्रीमती प्रतिभा भागवतकर जिल्हा समाज कल्याण अधिकारी, यांनी केले आहे.

(प्रतिभा भागवतकर)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद वर्धा

Scanned with OKEN Scanner